Vol. 4 Special Issue -1 March 2018
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

Special Issue on the Occasion of Maharashtra State Commission For Women and YCMOU Study Centre Sponsored National Seminar on

## Domestic Injustice and Women

March 8, 2018

Organized by

**Dept. of Home Science,**
**Shri Panditguru Pardikar Mahavidyalaya,**
**Sirsala, Dist. Beed (MS).**



*Guest Editor*
**Dr. R. T. Bedre**

*Associate Guest Editors*
**U. Y. Mane**
**A. B. Walke**

18. Vijay Tendulkar's 'Silence! The Court is in Session': A Woman Denied the Right to be a Woman / Mr. Tukaram B. Bobade | 91
19. भारतीय समाज और महिलाएँ / पी. सुनीता | 97
20. छहेज:स्त्री उत्पीडन प्रथा और प्रतिबन्धक कानून / प्रा विद्या बा. खाडे | 103
21. घरेलू हिंसा:महिलाओं का जीवनसंघर्ष एक विवेचन / प्रा.सुजाता सू. हजारे | 107
22. स्त्रियांचा वडिलोपार्जित संपत्तीतील समान हक्क कायदा 2005 : एक अभ्यास / प्रा.उषा यशवंतराव माने | 114
23. स्त्रियांचा वडिलोपार्जित व पतीच्या संपत्तीतील हक्क. / डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे) | 122
24. स्त्रीयांचा वडिलोपार्जित व पतीच्या संपत्तीतील हक्क / प्रा. राणी जगन्नाथराव जाधव | 128
25. स्त्रियांच्या विकासातील उच्चषिक्षणाचे महत्व एक अभ्यास / डॉ.जयदिप रा. सोळंके | 139
26. स्त्रीया व मानवी हक्क / प्रा.डॉ. अहिरे भास्कर मुरलीधर | 146
27. स्त्रिया व मानवी हक्क / प्रा.डॉ.शिवाजी गोविंदराव दिवाण | 151
28. स्त्रिया व मानवी हक्क / डॉ. बाबासाहेब गणपतराव देशमुख | 158
29. स्त्रिया व मानवी हक्क / प्रा. सलमा शेख, प्रा.निकाळजे जे. व्ही. | 164
30. महिला अत्याचार / प्रा.बिजायसिंग भाबरदोडे | 166
31. महिलावरील कौटुंबीक अन्याय आणि मानवाधिकार : संवैधानिक तरतुदींचा अभ्यास / डॉ.प्रा.जी.व्ही. गट्टी | 175
32. मानवाधिकार व स्त्रीयांचे प्रश्न एक दृष्टीक्षेप / प्रा.डॉ.कदम एच.पी. | 179
33. महिला सबलीकरण विषयी कायदे व जाणीवा / डॉ.लोखंडे बी.बी. | 182
34. महिंला अत्याचार विरोधी कायदेविषयक तरतूदींचा अभ्यास/ प्रा.शशिकांत परळकर | 191
35. महिलांच्या लैंगिक छळ विरोधी कायदा भूमिका व मार्गदर्शन / डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई | 196
36. महिला विषयक कायदे एक अभ्यास / प्रा.अरूणा वाळके | 203
37. महिला अत्याचार आणि कायदे / प्रा.डॉ.ज्ञानेश्वर सोनवणे | 209
38. भारतातील स्त्री शोषण आणि समस्यांचा अभ्यास / प्रा.डॉ.कुंभारीकर एन.एन. | 219
39. स्त्रियांवरील अत्याचार आणि कौटुंबिक हिंसाचाराची कारणे / प्रा.सय्यद अफरोज अहेमद | 223
40. स्त्री भ्रूणहत्या : भारतीय समाजापुढील एक आव्हाण / डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे | 229
41. आधुनिक स्त्रीवादी कवितेतून चित्रीत महिलावरील अन्यायाचे चित्रण--एक अभ्यास / प्रा. मायकर रामहरी बन्सी | 236
42. रामनाथ चव्हाण यांच्या साहित्यातील स्त्रियांचे चित्रण / प्रा.संभाजी दादाराव गायकवाड | 241
43. निवडक नाटकातील स्त्री पात्रं, त्यांची व्यथा व मानसीकता : एक अभ्यास / गालफाडे एस. बी. | 246
44. महिला विषयीची सामाजीक मानसिकता / प्रा.संध्या ठाकरे | 252
45. कुटूंब स्तरावरील संस्कार व दुय्यम स्थान / प्रा.होके कैलास म. | 260
46. महिला अत्याचार प्रतिबंधक कार्यातील राष्ट्रीय महिला आयोगाची भूमिका : एक अभ्यास / प्रा.जी.एन.सोनवणे | 263
47. बालमजुरांचे मानवी हक्क आणि स्वयंसेवी संस्था / डॉ. भालेराव जे.के. | 268
48. स्त्रीयांच्या आहारातील कॅल्शीयम आणि लोहाचे महत्व / प्रा.सौ.बोरीवाले एम.पी. | 273
49. आरोग्य व उच्च शिक्षणाचे स्त्रियांच्या विकासातील महत्व / डॉ.जिजा राऊत | 277

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

स्त्री अत्याचार व कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदे केले गेले असले तरी पुरुष प्रधान समाज व्यवस्था असल्यामुळे स्त्रीयांना या कायद्याचा फारसा उपयोग होत नाही.

**निष्कर्ष :-**

१. स्त्रीची एक व्यक्ती म्हणून ओळख होणे आवश्यक आहे.
२. कौटुंबिक हिंसाचारास जबाबदार असणाऱ्या कारणांचा अभ्यास करता आला.
३. पुरुष प्रधान मानसिकतेत परिवर्तन घडवणे आवश्यक आहे.
४. स्त्रीयांची कौटुंबिक मानसीकता बदलावी.
५. कायदे सक्षम व सशक्त असावेत.
६. महिला अत्याचार कौटुंबिक हिंसाचारासाठी महिला कोर्टाची वेगळी स्थापन करण्यात यावी.

**संदर्भ :-**


१. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे रक्षण करणारा अधिनियम २००५ व नियम २००६ ए.के. गुप्ते, बुधवार पेठ,पुणे.
२. महिला सबलीकरण - स्वरुप व समस्या - डॉ.शूभांगी खोटे, वरद पब्लीकेशन औरंगाबाद.
३. स्त्री भ्रूणहत्या विरोधी समाज जागृती - संपादक डॉ. कुसुम पवार , प्रा. प्रविण अनभूले अरुणा प्रकाश , लातूर
४. मानवी हक्क - बि,ब .पाटील
५. महिला सबलीकरण - रोडे विजया.


❑❑❑



Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

40

# स्त्री भ्रूणहत्या : भारतीय समाजापुढील एक आव्हान


**डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे**
समाजशास्त्र विभागप्रमुख
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ ता. सोनपेठ जि. परभणी
मो. 8983776077


स्त्री आणि समाज यांचा संबध आहे. समाज हा विविध सामाजिक संस्थांनी युक्त आहे. स्त्री ही कुटूंब संस्थेचा प्रमुख आधार आहे स्त्री ही सौंदर्याचे प्रतिक आहे. स्त्री ही प्रेरणास्थान आहे, स्त्री ही समाजस्थिरतेचे द्योतक आहे. म्हणुनच स्त्री ही समाजरचनेचे एक अविभाज्य अंग आहे परिणामी स्त्री ही मानवी समाजाचा प्रमुख घटक आहे. जगातील साधारणः निम्मी लोकसंख्या ही स्त्रियांनी व्यापली आहे. म्हणूनच स्त्रियांना 'अर्धे विश्व' (Half Universe) म्हटले जाते. कोणत्याही समाजव्यवस्थेचा अभ्यास करतांना त्या समाजातील स्त्रीयांचा दर्जा कसा आहे हे अत्यंत महत्वपूर्ण मानले जाते. समाजाचा विकास हा त्या समाजाची प्रगती, रस्ते, इमारती, तंत्रज्ञान, संशोधने यावरून ठरत नाही तर त्या समाजातील स्त्रियांचे स्थान/दर्जा काय आहे, कसा आहे, या वरून समाजाच्या विकासाचे मुल्यमापन केले जाते.

समाजव्यवस्था, सामाजिक दर्जा आणि सामाजिक भुमिका यांचे घनिष्ठ संबध असतात. समाजातील प्रत्येक व्यक्तीस विशिष्ट कालावधीमध्ये विशिष्ट स्थान लाभलेले असते. स्थान, पद प्रतिष्ठा, मानसन्मान, महत्व म्हणजे सामाजिक दर्जा होय. व्यक्तिच्या सामाजिक दर्जाचा संबध हा समाजाच्या कायदा व्यवस्थेशी सुध्दा निगडीत असतो. दर्जा ही सापेक्ष, परिवर्तनीय व तुलनात्मक स्वरूपाची संकल्पना आहे. स्त्रियांच्या सामाजिक दर्जाचे तीन प्रमुख प्रकार संभवतात. पुरुषांच्या सामाजिक दर्जाच्या तुलनेत उच्च सामाजिक दर्जा, समान दर्जा आणि कनिष्ठ सामाजिक दर्जा असे स्त्रीयांच्या सामाजिक दर्जाचे तीन प्रकार आहेत. "कोणत्याही समाजाच्या संक्रमणकालीन परिस्थितीचे यथार्थ मुल्यांकन त्या समाजाचा भुतकाळ, वर्तमान व भविष्यकाळ यांच्या संदर्भात करणे योग्य असते" एक सामान्य चित्र असे निदर्शनास येते की, ज्या

समाजामध्ये स्त्रियांना सामाजिक दर्जा दिला जातो, सर्व क्षेत्रात स्त्रियांना मान सन्मान जोपासला जातो त्या समाजातील परिवर्तन प्रकिया आणि विकास प्रकिया अधिक गतिमान होत असतात. महात्मा गांधी म्हणतात, “स्त्री जर प्रत्येक क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने काम करू लागली तर देशाची प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही” त्यामुळे स्त्रियांचा सामाजिक दर्जाविषयक अभ्यास हा समग्र समाजाच्या विकासाच्या दृष्टीने देखील आवश्यक व महत्वाचा ठरतो.

**शोधनिबंधाचा उद्येश:**

- स्त्रियांचे विविध प्रश्न जाणुन घेणे.
- स्त्रियांच्या सामाजिक दर्जाची तपासणी करणे.
- भ्रृणहत्याचा इतिहास जाणुन घेणे.
- स्त्रीभ्रृण हत्येच्या कारणांचा शोध घेणे.
- स्त्रीभ्रृण हत्येचे समाजजीवनावरील परिणामांचा अभ्यास करणे.
- स्त्रीभ्रृण हत्येवर प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचवणे.
- स्त्रीभ्रृणहत्ये बाबत समाजाची मानसीकता अभ्यासणे.

**संशोधन पध्दती:** प्रस्तुत शोध निबंध दुय्यम तथ्य संकलनावर आधारीत असून यासाठी संदर्भग्रंथे, मासीके, वृत्तपत्रे, इंटरनेट यांच्या मदतीने शोधनिबंधाची मांडणी केली आहे.

**गृहितकृत्य:** पुरूष प्रधान समाजव्यवस्था व पारंपारिक मानसिकता यामुळे स्त्री भ्रृणहत्या मोठ्या प्रमाणात होत आहेत. लोकसंख्येची नक्की आकडेवारी असल्या खेरीज कोणत्याही योजना आखणे, अभियाने राबविणे, शासकीय कार्यक्रम जाहीर करणे व त्यांची अम्मलबजावणी करणे अशक्य आहे. ‘जगनगणना म्हणजे एका ठरावीक कालावधीत एका ठराविक प्रदेशातील लोकसंख्येची करण्यात येणारी मोजणी होय’. 2011 च्या जनगणनेनुसार 1 मार्च 2011 रोजी भारताची लोकसंख्या 121, 019, 3, 422 इतकी होती. भारतात 640 जिल्ह्यातील 6 लाख खेडी व 7 हजार 742 शहरे असून भारतीय गृहमंत्रालया तर्फे जनगणना केली जाते. आपली ‘जनगणना आपले भविष्य’ (Our census our future) हे 2011 च्या



जनगणनेचे ब्रिद होते. खरोखरच आपली जनगणना ही आपले भविष्य ठरते. कारण की, देशाची आर्थिक, सामाजिक, राजकीय, औद्योगिक घडी व्यवस्थीत बसविण्यासाठी राज्यकर्ते, अधिकारी व कर्मचाऱ्यांना संकलित माहितीचा उपयोग होतो व याची मदत देशाचा सर्वांगीन विकास आराखडा तयार करतांना होते. 2011 च्या जनगणनेनुसार मुलींचे प्रमाण घटत असून महिलांच्या दृष्टीने ही चिंताजनक बाब आहे. महासत्ता होऊ पाहाणाऱ्या आपल्या देशात केव्हा होणार मुलीच्या जन्माचे स्वागत हा प्रश्न निर्माण झाला आहे. ‘एक हजार मुलांमागे मुलींचे प्रमाण कमीत कमी 960 तरी असले पाहिजे’ असा जागतीक मानदंड आहे, परंतु आपल्या कडे हे प्रमाण झपाट्याने घसरत आहे. काही जिल्ह्यात तर ते प्रमाण 750 पर्यंत घसरले आहे. समाजाने हा गंभीर धोका ओळखुन त्या विरूध्द गंभीर पावले उचलली नाहीत व स्त्रीविरोधी दृष्टीकोन बदलला नाही तर मानवनिर्मित आरीष्टांमध्ये आपला देश सापडेल.

**भ्रृणहत्येचा इतिहास:** ‘हिंदु : मॅनर्स, कस्टम्स ॲण्ड सेरेमनीज’ या ग्रंथात दुबाईस यांनी लिहीले आहे की, प्राचीन भारतात शिशुहत्या ही परंपरा रूढ होती. त्यांच्या मते शिशुहत्या हे एक हे धार्मिक कृत्य होते आणि त्या हत्यात सर्वात अधिक कन्या शिशुची हत्या त्यांच्या जन्म प्रसंगी केली जात असे यावरून भ्रृण हत्येचा इतिहास प्राचीन मानवा लागेल.

आधुनिक काळात गर्भपाताच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या भ्रृणहत्या ही विसाव्या शतकाच्या प्रारंभीची घटना आहे. स्कॉटलॅंडची मुळ नागरिक मॅरी शालोट स्टोप्स यांनी 1921 मध्ये आपला पती एच.वी.से. बरोबर लंडनमध्ये आपत्यांचा जन्म रोकण्यासाठी पहिले रूग्णालय उघडले. गर्भपात आणि संततीला जन्म देण्यापासुन रोखण्यासाठी सुरू करण्यात आलेले हे रूग्णालय खिश्चन धर्माविरूध्द आहे अशी भुमीका चर्चने घेतली व या दाम्पत्या विरूध्द मोहीम उघडली परंतु मॅरीने आपले अभीयान सुरूच ठेवले. गर्भपातास इंग्रजीत एबॉर्शन म्हणतात. 36 किंवा 37 आठवड्याच्या आगोदर जो गर्भ पाडला जातो त्याला गर्भपात संभोततात. प्रारंभी गर्भपात हे लिंगपाहुन करण्याची विधी नसल्यामुळे स्त्री भ्रृणहत्येचा प्रश्न निर्माण झाला नाही.

Late. Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

वैज्ञानीक अविष्काराचा परिणाम म्हणून जेंव्हा अल्ट्रासाउंड (अल्ट्रा सोनोग्राफी) चा शोध लागला आणि त्यातून गर्भात असणारे भृण स्त्री आहे की पुरूष असे लिंगनीदान केले जाउ लागले तेंव्हा खरा प्रश्न निर्माण झाला. खरे तर अल्ट्रासाउंडाचा शोध गर्भातील भृणाचे अपंगत्व तपासणीसाठी झाला होता. परंतु मानसीक व्यंग असणाऱ्या मानवाने त्याचा उपयोग स्त्रीवर्गाचा भंग करण्यासाठी केला. सोनोग्राफी तंत्राच्या गैरवापरामुळे ही समस्या दिवसेंदिवस बिकट बनत आहे. आता या गर्भलिंगनिदान करण्याच्या बाबतीत विषारी प्रचारही केला जात आहे की गर्भपरिक्षणासाठी 2 हजार खर्च करून 2 लाख (हुंड्याचे) वाचवा. मुलीचा जन्म झाल्यानंतर तीला मारणारा समाज तर आज तीला जगात येण्यापुर्वीच संपवत आहे. इतिहासाचा हा प्रवास उन्नतीकडे जातो आहे की, अवनतीकडे याचे परिक्षण झाले पाहीजे.

**वैश्वीक व भारतीय स्त्रीभ्रृणहत्येची आकडेवारी:** स्त्रीभ्रृणहत्ये संदर्भात वैश्विकदृष्ट्या प्रती हजार पुरूषामागे स्त्रीयांचे प्रमाण कीती आहे, या अनुषंगाने 2000 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या लोकसंख्या विभागाने प्रकाशीत केलेल्या आकडेवारीनुसार चीन–944, भारत–933, अमेरिका–1029, इंडोनेशिया–1004, ब्राझील–1025, पाकिस्तान–938, रशिया–1140, बांग्लादेश–953, जपान–1041, नायजेरिया–1016 असे देशपरत्वे स्त्रियांचे प्रमाण आहे यात विकसनशील राष्ट्रातील स्त्रियांचे प्रमाण कमी दिसून येते.वरिल आकडेवारी भारतात होणाऱ्या स्त्रीभ्रृणहत्या सर्वाधीक असल्याचे दर्शवते.

भारताच्या अनुषंगाने 1901 ते 2011 पर्यंतच्या लिंग पाताचे अनुशिलन केल्यास 1901 ला प्रति हजार पुरूषा मागे 972 स्त्रिया होत्या तर इ.स. 2011 मध्ये हेच प्रमाण 914 इतके झाले आहे. यावरून भारतीय समाजात स्त्रीयांची संख्या उत्तरोत्तर घटत असल्याची निदर्शनास येते.

इंडियन मेडिकल आसोसिएशन (आय.एम.ए.) च्या मते दरवर्षी 50 लाख स्त्रीभ्रृणहत्या घडून येतात. तर आखील भारतिय लोकसंख्या प्रभागाच्या मतानुसार प्रसुतीपुर्वीच मृत पावलेल्या बालकांची संख्या 4 ते 5 करोड दरम्यान आहे. तर संपुर्ण देशात दरवर्षी एकूण फक्त 107 स्त्रीभ्रृण हत्या होतात असे सरकारचे मत



आहे. स्त्रीभ्रृणहत्येचा निश्चित आकडा आजपावतो कोणालाही सांगता आला नाही. कारण गुप्तपणे स्त्रीभ्रृणहत्या करण्याचे प्रमाण खुप मोठे आहे.

**स्त्रीभ्रृणहत्ये मागची कारणे:** समाजातील कोणताही प्रश्न सोडवण्यासाठी त्यामागच्या कारणांचा शोध घ्यावा लागतो व त्याच्या मुळावर जोपर्यंत घाव घातला जात नाही, तो पर्यंत तो प्रश्न संपृष्टात येत नाही. आजुनही स्त्रीभ्रृणहत्ये मागची कारणे तीच आहेत. फक्त त्याचे स्वरूप, तिव्रता कमी अधिक आहे, परंतु मुळ कारणे व त्या मागची मानसीकता या मध्ये काहीही फरक पडला नाही.

1. पुरूषसत्ताक समाजव्यवस्था
2. समाज व्यवस्थेतील स्त्रियांचा दुय्यम दर्जा.
3. मुलीला द्यावा लागणारा हुंडा व लग्नाचा प्रचंडा खर्च
4. मुलगा वंशाचा वारस व म्हातारपणाची काठी
5. वाढती महागाई
6. महिलांच्या वाढत्या जबाबदाऱ्या व ताणतणाव
7. महिलांची वाढत जाणारी असुरक्षितता

अशा विविध कारणांमुळे भारतिय समाजव्यवस्थेत स्त्रीभ्रृणास नाकारले जाते, परंतु त्याच्या दुष्परिणामांचा सामना समाज करत आहे, करावा लागणार आहे.

**स्त्रीभ्रृणहत्येचे समाजजीवनावरील परिणामः**

1. भारतीय संस्कृतीचे पतन होत आहे.
2. महिला सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण होइल.
3. महिलांवर, मुलींवर कुटूंबातून पुर्वीप्रमाणेच अधिक बंधने लादली जातील.
4. बहुपती विवाहपध्दतीस पोषक वातावरण निर्माण होईल.
5. महिलांवरील विनयभंगाचे प्रमाण वाढतच जाईल.
6. परराज्याप्रमाणे महाराष्ट्रालाही लग्नासाठी मुली आयात कराव्या लागतील.
7. आंतरजातीय, आतंरधर्मीय विवाहाचे प्रमाण वाढेल.

मुलांची संख्या वाढेल व मुलींची संख्या अतीशय कमी यामुळे सामाजिक समतोल बिघडेल.



nesh & Narpudkar Co
Somnath

9. मुलींचे सामाजिक आरोग्य धोक्यात येइल.
10. मुलांचे विवाह योग्य वयात होणार नाहीत परिणामी वैयक्तीक, कौटूंबीक, सामाजीक आरोग्यविषयक समस्या निर्माण होतील.

एकंदरीत पुरूषांचे वाढते प्रमाण व स्त्रियांची कमी होणारी संख्या यामुळे बहुपत्नीत्व, महिला असरुक्षा, बलात्कार, आत्याचार, रोगराई यांचा प्रसार होइल व त्यामुळे राष्ट्रविकासात अडथळा निर्माण होईल.

**स्त्रीभ्रूणहत्येचे प्रतिबंधासाठीच्या उपाययोजनाः** स्त्रीभ्रूणहत्येचे वैयक्तीक, कौटूंबीक, आरोग्यविषयक, सामाजिक परिणाम पाहाता यावर प्रतिबंध घालण्यासाठी उपाय करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी पुढील उपाययोजना करणे आवश्यक आहे.

1. स्त्री–पुरूष समानता कायद्यात वा घटनेत न राहाता ती प्रत्यक्षात यावी.
2. मुलगा जशा कुटूंबाचा वारस आहे तशीच मुलगी सुध्दा कुटूंबाचा वंश पुढे चालवते अशी समाजाची मानसीकता तयार करावी.
3. मुलीच्या जन्माचे आनंदाने स्वागत व्हावे.
4. स्त्रीभ्रूणहत्या विरोधी कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी.
5. अंगणवाडी सेवीका, मदतनीस, आशा कार्यकर्त्या, आरोग्य कर्मचारी, बचत गटाच्या महिलांनी दैनंदीन कामकाज करतांना स्त्रीभ्रूणहत्येला प्रतिबंध घालण्यासाठी जनजागृती करावी.
6. गर्भलिंग निदान करणाऱ्या डॉक्टर वर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा.
7. मुलींसाठी मोफत शिक्षण तसेच कायद्याने सुरक्षितता द्यावी.
8. महिला सबलीकरणास अधिकाधिक चालना देणे.
9. प्रत्येक मातेने आपल्या मुलीच्या जन्मासाठी, संरक्षणासाठी व प्रगतीसाठी आग्रही असावे.

**निष्कर्षः** विवीध सामाजिक समस्या या समाजाचा समतोल दोलायमान करतात वाढत्या स्त्रीभ्रूणहत्यामुळे सामाजिक, कौटूंबिक, सास्कृतीक व पाकृतीक समतोल पुर्णतः समाप्त होतो की काय अशी स्थिती निर्माण झाली आहे. कायदा व दंडात्मक कार्यवाही करून स्त्रीभ्रूणहत्या ही समस्या संपुष्टात येइल असे वाटत नाही.



एखाद्या समस्येचे समुळ उच्चाटन करायचे असेल तर त्या समाजाच्या सामाजिक मानसीकतेची पुनर्बांधनी करणे करणे आवश्यक असते. स्त्रियांविषयी समाजाची जी नकारात्मक मानसिकता आहे ती प्रबोधनाव्दारे, जनजागृती व्दारे बदलने गरजेचे आहे. स्त्रिभ्रूणहत्या ही संकुचीत दृष्टीकोनाचा परिपाक आहे. म्हणुन समाजात जोपर्यंत स्त्रीयांबददल व्यापक दृष्टीकोण निर्माण होण्यासाठी प्रामुख्याने यात तरूणांनी सहभाग नोंदवुन 'लोकल ते ग्लोबल' अशा प्रबोधनात्मक कार्यक्रमांची आखणी करावी लागेल, आणि जोपर्यंत स्त्रियांनी आपल्या आपत्याविषयी स्वतःचा निर्णय घेउन स्त्रिभ्रूणाचे संरक्षण व संवर्धन करणार नाहीत तो पर्यंत खऱ्या अर्थाने स्त्रिभ्रूणहत्येवर प्रतिबंध बसने अशक्य आहे.

**संदर्भसूचीः**


1. संपादक डॉ. राजशेखर सोलापुरे, महिला विकास प्रश्न–पैलू–प्रयास, अरूणा प्रकाशन लातुर, सप्टेंबर 2012, पृ. 23, 24, 37, 38, 42.
2. संपादक डॉ. भारंबे, डॉ. जावळे, डॉ. कोल्हे, स्त्री भ्रृणहत्या आणि स्त्रियांवरील वाढते आत्याचार एक सामाजिक समस्या, प्रशांत पब्लीकेशन, मार्च 2015, पृ. 36.
3. Journal of Advance Public Administration, Sep. 2 Feb. 2012, Vol. I P.N. 120 to 124.
4. संपादक डॉ. कुमार, डॉ. गुप्ते, महिला गौरव ग्रंथ, बहुजन साहित्य प्रसारण केंद्र, नागपुर, 8 मार्च 2016, पृ. 90–93.
5. संपादक, डॉ. मुंढे, महिला सक्षमीकरण स्वरूप आणि विकास अरूणा प्रकाशन, लातुर, फेब्रुवारी 2016, पृ. 192,193.
6. डॉ. कृष्णकुमार चौधरी : स्त्री सशक्तीकरण, चुनैतीया व संभावनाएँ, समाजकल्याण, मार्च 2015, पृ. 08
7. लोकराज्य जुलै 2007, मार्च 2010, सप्टेंबर 2011.
8. टाईम्स ऑफ इंडिया, 25 मे 2011.
9. हाशियो की आवाज, मासिक पत्रिका, मे 2015.
10. दै. सामना, उत्सव, 19 जाने 2016.


❑❑❑

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani